**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री धनाजी दत्तू कांदे
रा. बारेगाव, खुर्द, ता. बार्शी
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
निवासी नायब तहसिलदार,
बार्शी, जि. सोलापूर

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार, बार्शी,
तहसिल कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७ /२००९/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१०.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. धनाजी दत्तू कांदे<br>रा. बारेगाव, खुर्द, ता. बार्शी, जि. सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसिलदार,<br>बार्शी, जि. सोलापूर श्रीमती जे. एच. पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसिलदार, बार्शी,<br>तहसिल कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर श्री. बी.एन. रंगदाळ | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१२.१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.-- |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>जमीन गट नं.५३० सरकारी मालकीचा असून त्यामध्ये किती लोकांनी अतिक्रमण केले त्याची यादी, ज्या अधिकाऱ्यांनी जागा मंजूर केली त्या आदेशाची प्रत |

## विवेचन

सरकारी मालकीच्या जमिनीत अतिक्रमण करणाऱ्यांची यादी व अतिक्रमण दूर करण्यासाठी केलेली कार्यवाही याबाबत कामगार तलाठी बोरगाव (खुर्द) व मंडल अधिकारी, पांगरी यांनी चुकीची माहिती देऊनही तहसीलदारांनी प्रत्यक्ष चौकशी व जागेवर पाहणी करून योग्य माहिती दिलेली नाही व कार्यवाही केलेली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. धनाजी दत्तु कांदे यांनी केले.

श्री. कांदे यांनी तहसीलदार, बार्शी यांच्याकडे अर्ज केला होता. त्यांच्याकडून तो गाव कामगार तलाठ्याकडे विलंबाने पाठविला गेला. अर्ज प्राप्त झाल्यावर माहिती त्वरित कार्यालयाकडे पाठविली. संबंधित अतिक्रमणाबाबतचे प्रकरण आकारणीसाठी मंडल अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आले होते. विषय गुंतागुंतीचा असल्यामुळे उत्तर देण्यास विलंब झाला, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. बी. एन.रंगदाळ यांनी नमूद केले. संबंधित जागेवर अतिक्रमण असेल तर तशी नोंद करून माहिती देण्याचे आदेश तत्कालीन तहसीलदार श्री. वसंत पवार यांनी तलाठ्यांना दिले. त्यानंतर तलाठ्याने अतिक्रमणाची नोंद करून माहिती दिली. श्री. कांदे यांची मुख्य मागणी अतिक्रमण का दूर केले नाही याबाबत चौकशी व्हावी व अतिक्रमणे त्वरित काढण्यात यावीत अशी आहे. माहितीच्या मागणीच्या अर्जात व अपिलात त्यांनी ती नमूद केली आहे. त्या अनुषंगाने उप विभागीय अधिकाऱ्यांनी संबंधित जागेला भेट देऊन पाहणी केली. बऱ्याच वर्षांपासून तेथे अतिक्रमणे असून मोजणी करून अतिक्रमण हटविण्याची मोहिम घ्यावी लागेल. याबाबत ग्रामस्थ, तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांच्या बैठकीत चर्चा झाली. ग्रामस्थांनी मोजणीचे पैसे भरले आहेत, परंतु अतिक्रमण असल्यामुळे तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांनी मोजणी केलेली नाही. तत्कालीन तहसीलदार श्री. वसंत पवार सध्या निलंबित आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विद्यमान तहसीलदार, बार्शी श्रीमती जे.एच. पाटील यांनी केले.

सरकारी जमीन ही सार्वजनिक मालमत्ता असून त्यावरील अतिक्रमणाबाबतची व ती दूर करण्यासाठी केल्या जाणाऱ्या कार्यवाहीची माहिती मिळणे हा नागरिकांचा हक्क आहे. कागदोपत्री

अतिक्रमणाची नोंद करून केवळ यादी देणे त्यासाठी पुरेसे नाही. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, श्रीमती जे.एच. पाटील यांनी प्रत्यक्ष जागेवर वस्तुस्थितीची पाहणी करून याबाबतची माहिती अपीलकर्त्याला दिली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. तहसीलदार, बार्शी, श्रीमती जे.एच. पाटील यांनी विषयांकित सरकारी जमिनीवरील अतिक्रमणाबाबत प्रत्यक्ष जागेवर पाहणी करून अतिक्रमण करणाऱ्यांची यादी व अतिक्रमण दूर करण्याच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कार्यवाहीबाबतचा अहवाल दि. ३१.१२.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा. त्याची प्रत अपीलकर्त्याला पुरवावी.

पुणे
दि. १६.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.किरण मोहन चवरे
गणेश नगर इंदिरानगर जवळ,
विजापूर रोड, सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव,
श्री महालक्ष्मी बहुऊदेशिय विद्या विकास संस्था,
श्री महालक्ष्मी प्रशाला, डाबरजवळगे
ता. अक्कलकोटे जि. सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी मुख्याध्यापक,
श्री महालक्ष्मी प्रशाला, डाबरजवळगे,
डाबरजवळगे ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९ /२००९/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१०.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. किरण मोहन चवरे<br>गणेश नगर, इंदिरानगर जवळ, विजापूर रोड, सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** सचीव,<br>श्री महालक्ष्मी बहुउद्देशीय विद्या विकास,<br>डाबरजवळगे, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर श्री. रेवणसिध्द शंकर बिराजदार<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** प्रभारी मुख्याध्यापक,<br>श्री महालक्ष्मी प्रशाला, डाबरजवळगे,<br>ता. अक्कलकोट, जि. सोलापूर श्री. नरेंद्र गोपाळ काजळे | |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.८.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८.१२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पावणेदोन वर्षांपासून जन माहिती अधिकारी तथा सचीव, श्री महालक्ष्मी बहुउद्देशीय विद्या विकास संस्था, डाबरजवळगे, ता. अक्कलकोट, यांनी माहिती दिली दिलेली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा संस्थेचे सचीव यांच्याकडे केलेल्या अपिलाच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी गैरहजर राहिले. शिक्षणाधिकाऱ्यांनी पत्र लिहूनही जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. किरण मोहन चवरे यांनी केले.

अपीलकर्ता हा अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, श्री महालक्ष्मी प्रशाला, डाबरजवळगे, ता. अक्कलकोट, यांच्या कार्यालयातील कर्मचारी असून माहिती मागण्यास तेच सांगत आहेत. परंतु तत्कालीन मुख्याध्यापक निलंबित असून कागदपत्रे संस्थेच्या ताब्यात आहेत. संस्थेत बेकायदेशीर कारभार चालला आहे, म्हणून शिक्षक संघटितपणे, स्वतंत्रपणे वागत आहेत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री महालक्ष्मी प्रशाला, डाबरजवळगे, ता. अक्कलकोट श्री. नरेंद्र गोपाळ काजळे यांनी केले. आपण संस्थेचे संस्थापक असून चांगली शिक्षण संस्था उभी केली. परंतु संघटनेच्या नावाखाली शिक्षणाधिकाऱ्यांसह कोणाचे आदेश न पाळता विद्यार्थ्यांच्या व संस्थेच्या नुकसानीला कारणीभूत ठरणारे काम शिक्षक करीत आहेत. आपण संस्थापक असून आपल्याला संस्थेत येऊ दिले जात नाही. शिक्षक अशैक्षणिक व मनोरंजनात्मक बाबींवर शाळेच्या वेळेत गुंतलेले असतात, त्याचा पुरावा आपल्याकडे आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, श्री महालक्ष्मी बहुउद्देशीय विद्या विकास संस्था, डाबरजवळगे, ता. अक्कलकोट, श्री. रेवणसिध्द शंकर बिराजदार यांनी केले.

संस्थांतर्गत वादातून शह-प्रतिशहाच्या राजकारणाचा भाग म्हणून माहितीच्या अधिकाराचा वापर उभय बाजू करीत आहेत, असे उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे यावरून दिसते. कागदपत्रे नेमकी कोणाकडे उपलब्ध आहेत, खरी कागदपत्रे कोणती व नियमानुसार तयार न केलेली कागदपत्रे कोणती, अशा स्वरूपाचे अनेक प्रश्न त्यात गुंतलेले आहेत. शिक्षणासारख्या क्षेत्रात दिसणारे हे चित्र विदारक

आहे. अशा वादासाठी माहितीच्या अधिकाराचा वापर न करण्याबाबत उभय बाजूंना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 .११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. युवराज हरीभाऊ बगाडे — अपीलकर्ता
सौ. शुभदा हरीभाऊ बगाडे
दोघे रा. ३११/२, ससाणेनगर, हडपसर, पुणे-२८

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक, — उत्तरवादी
शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, पुणे विभाग, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक शिक्षण उपसंचालक,
शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, पुणे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८०६ + ८०७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. हरीभाऊ जगन्नाथ बगाडे
सौ. शुभदा हरीभाऊ बगाडे
दोघे रा. ३११/२, ससाणेनगर, हडपसर, पुणे-२८

**अपिलीय प्राधिकारी तथा** — शिक्षण उपसंचालक,
शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, पुणे विभाग,
पुणे श्री. ग.कृं. म्हमाणे

**जन माहिती अधिकारी तथा** — सहाय्यक शिक्षण उपसंचालक,
शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, पुणे विभाग,
पुणे श्री. सुनिल जंगल कुऱ्हाडे

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ८०६ / पुणे | ५.३.२००७ | २१.३.२००७ | १६.५.२००७ | ७.५.२००७ |
| ८०७ / पुणे | २७.२.२००७ | २१.३.२००७ | २१.४.२००७ | ७.५.२००७ |
| ८ | माहिती मागणीचा मूळ अर्ज (जोडपत्र-अ) ची प्रत सोबत जोडली आहे. | | | |

## विवेचन

आपण श्री. हरीभाऊ जगन्नाथ बगाडे यांचे सेवापुस्तक, निवृत्तीनंतरचा लाभ आदीबाबत वारंवार मागणी करूनही माहिती दिली जात नाही. त्यांच्या प्रलंबित मागण्यांची तड लावली जात नाही. त्यांची वारंवार बदली करण्यात आली. नियत वयोमानाच्या आधी, १९९५ साली संस्थेने त्यांना निवृत्त केले. आम्ही न घेतलेले पंचवीस हजाराचे कर्ज को-या पावत्यांवर सह्या घेऊन वसूल केले. मूळ सेवा पुस्तक न देता सेवानिवृत्तीनंतर केलेल्या खोट्या व अपु-या नोंदी असलेले सेवापुस्तक दिले जाते. नवीन सेवा पुस्तक तयार करुन त्यामध्ये सर्व नोंदी बिनचूक असाव्यात, पगारवाढ, रजा व वरिष्ठश्रेणी यांचा त्यात समावेश असावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री. युवराज हरीभाऊ बगाडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपील अर्जात केली आहे. या मागण्यांबाबत सौ. शुभदा हरीभाऊ बगाडे यांनी बाजू मांडली.

अपीलकर्त्यांना सर्व संचिका देण्याची तयारी दर्शविली होती, परंतु शुल्क जास्त होत असल्याच्या कारणावरून श्री. युवराज बगाडे यांनी अभिलेखाचे अवलोकन केले व त्यानुसार त्यांना आवश्यक असलेली माहिती दिली. जन्म तारखेचा दाखला, सेवा पुस्तक आदीबाबत श्री.बगाडे यांच्याकडून आवश्यक बाबींची पूर्तता झालेली नाही. सेवापुस्तक श्री. बगाडे यांनी नेले आहे, असे शाळेकडून सांगितले व तशी पोहच आहे. श्री. बगाडे यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सर्व संबंधितांसह एक बैठक घेतली, परंतु अशा बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने त्यांनी पुन्हा माहितीची मागणी करणारे अर्ज केले. अशा प्रकारे कुटुंबातील सदस्यांनी एकाच कारणासाठी अर्ज व अपिले करणे यातून मूळ प्रश्नांची तड लावण्याबाबत प्रगती होत नाही, याची कल्पना त्यांना देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण उपसंचालक, पुणे श्री. सुनिल जंगल कुऱ्हाडे यांनी केले.

श्री. हरीभाऊ बगाडे यांना त्रास झालेला आहे, हे एकूण प्रकरण पाहता लक्षात येते. तथापि प्रश्न सोडविण्यासाठी शिक्षण खात्याने सहकार्याची व सहानुभूतीचीच भूमिका घेतली आहे. श्री. हरीभाऊ बगाडे यांनी स्वत: सेवापुस्तक घेतले असून ते त्यांनी सादर केल्याशिवाय पुढील कार्यवाही करता येणार नाही, हे त्यांना वारंवार सांगण्यात आले आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे श्री. ग.कृं. म्हमाणे यांनी केले. श्री. बगाडे यांच्या मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त मुद्दे प्रथम व द्वितीय अपिलामध्ये उपस्थित केले जात असल्याचे जन माहिती अधिकारी श्री. सुनिल जंगल कुऱ्हाडे व अपिलीय प्राधिकारी श्री. ग.कृं. म्हमाणे यांनी नमूद केले.

दुबार सेवापुस्तकाच्या छायांकित प्रती श्री. हरीभाऊ जगन्नाथ बगाडे यांनी जन माहिती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी यांनी द्याव्यात. या सेवापुस्तकानुसार तीन महिन्यांच्या मुदतीत त्यांच्या मूळ मागणीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण उपसंचालक, पुणे यांनी आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. आपण मूळ सेवापुस्तकाच्या सत्य प्रती दि. १८.२.२००९ रोजी शिक्षण उपसंचालक कार्यालयात सादर करु, असे सौ. शुभदा हरीभाऊ बगाडे यांनी नमूद केले. आयोगापुढील सुनावणीत कबूल केल्याप्रमाणे श्री. हरीभाऊ जगन्नाथ बगाडे यांच्या मुळ सेवापुस्तकाच्या सत्य प्रती सौ. बगाडे यांनी अद्यापपर्यंत सादर केलेल्या नाहीत. त्या सादर केल्यास श्री. बगाडे यांना देय होणारा लाभ / रक्कम, रजा आदिबाबत पुढील कार्यवाही करणे सुलभ होईल, अन्यथा या संदर्भात होणाऱ्या विलंबास सर्वस्वी आपण जबाबदार रहाल असे शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांच्या वतीने श्री. व्ही.एम.गायकवाड यांनी श्री. बगाडे यांना पाठविलेल्या दि. २.३.२००९ च्या पत्रात नमूद करण्यात आले आहे. तसे आयोगाला त्यांनी अवगत केले आहे. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. ३० .११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. अणासाहेब यादवराव राऊत
टेलीकॉम, वृंदावन गृहनिर्माण हौसिंग सोसायटी,
संजयनगर रोड, श्रीरामपूर, जि.अहमदनगर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापकीय संचालक,
पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे
शिवाजीनगर, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अधिकारी (प्रशासन),
पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे
शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. अणासाहेब यादवराव राऊत
टेलीकॉम, वृंदावन गृहनिर्माण हौसिंग सोसायटी,
संजयनगर रोड, श्रीरामपूर, जि.अहमदनगर

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अधिकारी (प्रशासन),
पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे
शिवाजीनगर, पुणे-५ श्री. नितीन धोत्रे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.२.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १२.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१७.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

चितळी डिस्टीलरीच्या संदर्भात आपण मागितलेल्या २४ पैकी फक्त सहा मुद्दयांची माहिती मिळाली. अन्य माहिती जाणीवपूर्वक नाकारण्यात आली. माहिती चितळी डिस्टीलरी कडून घेण्यास आपल्याला कळविण्यात आले. परंतु या चितळी डिस्टीलरीच्या व्यवस्थापकीय संचालकांचा पदभार पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, पुणे च्या व्यवस्थापकीय संचालकांकडेच असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा विकास अधिकारी (प्रशासन) ती माहिती संकलित करुन देऊ शकले असते. पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाचे जन माहिती अधिकारी श्री. नितीन धोत्रे यांनी स्वत: अनियमीत कामे करुन शासनाचे मोठे आर्थिक नुकसान केले असल्यामुळे ही माहिती दडवून ठेवण्यात आली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. अण्णासाहेब यादवराव राऊत यांनी केले.

श्री. राऊत यांनी याच विषयाच्या संदर्भात माहिती मागणारे अनेक अर्ज केले असून त्या त्या वेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे, त्याची पोहच महामंडळाकडे आहे. या अपिलाच्या संदर्भात जी माहिती मिळाली नाही, असे ते म्हणतात त्यातील काही मुद्दे मोघम स्वरुपाचे होते. ते स्पष्ट करण्याबाबत त्यांना वेळीच कळविण्यात आले होते. तसेच चितळी डिस्टीलरीशी संबंधीत माहिती महामंडळाच्या अभिलेखात नसून व्यवस्थापकीय संचालक, चितळी डिस्टीलरी लि., यांच्याकडून ती घ्यावी, असे त्यांना कळविण्यात आले होते. श्री. राऊत स्वत: चितळी डिस्टीलरीचे कर्मचारी असून झालेली बदली व अन्य संदर्भातील वादामधून श्री. राऊत सातत्याने अशा स्वरुपाचे अर्ज करीत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विकास अधिकारी (प्रशासन) श्री. नितीन धोत्रे यांनी केले.

श्री. राऊत यांच्या अर्जातील अनेक मुद्दे मोघम स्वरुपाचे व भाष्य करणारे आहेत. नेमक्या माहितीच्या मागणीबाबतचे स्वतंत्र पत्र अपीलकर्त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना द्यावे. त्या अनुषंगाने चितळी डिस्टीलरीच्या संदर्भातील माहितीसह सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांनी १० दिवसांत उपलब्ध करुन द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.
मात्र श्री. राऊत यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना पाठविलेल्या पत्रात कोणत्याही कागदपत्रांची आवश्यकता नसून आपण विचारलेल्या मुद्दयांची फक्त होय किंवा नाही, अशी उत्तरे द्यावी, असे कळविले आहे.

अशा प्रकारे माहिती देता येत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा विकास अधिकारी (प्रशासन) यांनी त्यांना कळविलेल्या पत्राची प्रत आयोगाला सादर केली. तसेच चितळी डिस्टीलरीच्या खाजगी करणाची प्रक्रिया शासनाने पूर्ण केली असून तिचे खाजगी मालकाकडे हस्तांतरण देखील झाले आहे, असे आयोगास कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**पुणे**
**दि. ३० .११.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

१) श्री. सुरेश बापुराव पाटील
२) श्री. संदीपान सावळाराम गायकवाड
७२५/ १/२३, शिवाजीनगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अध्यक्ष,
श्री. शिवाजी शिक्षण मंडळ,
बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** जनरल सेक्रेटरी,
श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, ता. बार्शी
जि. सोलापूर

| अ.क्र. | अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | ८३२ | २८.१२.२००७ | -- | २.२.२००८ | -- |
| २ | ८३३ | २७.१२.२००७ | -- | १२.२.२००८ | -- |
| ३ | ८३४ | २७.१२.२००७ | -- | १२.२.२००८ | -- |
| ४ | ८३५ | ३.१.२००८ | -- | १८.२.२००८ | -- |
| ५ | ८३८ | ३१.१२.२००७ | -- | १२.२.२००८ | -- |
| ६ | ८३९ | १.१.२००८ | -- | -- | -- |
| ७ | ८४० | २.१.२००८ | -- | १२.२.२००८ | -- |
| ८ | ८४१ | ४.१.२००८ | -- | १२.२.२००८ | -- |
| ९ | ८४२ | ७.१.२००८ | -- | १२.२.२००८ | -- |

**<u>विवेचन</u>**

राज्य माहिती आयोगाने दि. ८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त वरील अपिलांचा समावेश होता.

जन माहिती अधिकारी तथा जनरल सेक्रेटरी व अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, जि. सोलापूर यांनी अपीलकर्त्यांना १५ दिवसांत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले होते. त्याप्रमाणे आवश्यक माहिती मिळाल्याने आपली कोणतीही तक्रार राहिलेली नाही, असे अपीलकर्त्यांनी दि. १०.११.२००९ रोजीच्या निवेदनाव्दारे आयोगास कळविले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.२३.११.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. भगवान मुकुंदराव लिमकर
मतिमंद निवासी विद्यालय,
धारुर, जि. बीड

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** आयुक्त,
अपंग कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निरिक्षक (राजपत्रित),
अपंग कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य पुणे - १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६१ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.१.२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.३.२००७ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - माहे ऑगस्ट २००४ ते माहे जानेवारी २००७ च्या काळात नव्याने मान्यता दिलेल्या शाळा, वाढीव विद्यार्थी व स्थलांतर दिलेल्या अपंग शाळांची माहिती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. भगवान मुकुंदराव लिमकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलाचा समावेश दि. २७.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त होता.

मागणीप्रमाणे सर्व माहिती मिळाली असल्याबद्दल अपीलकर्त्याचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या दि. २५.७.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि३०-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम ,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग , पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे-१

श्री.दत्तात्रय मोहन पेठकर
११५२अ, विष्णू गल्ली,
मु.पो.व ता.तासगाव,
जिल्हा सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा नियोजन अधिकारी,
जिल्हा नियोजन समिती , सांगली

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक जिल्हा नियोजन समिती
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६९ / सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २/१२/२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २३/१२/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | ३/१/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | १३/१/२००९ |

६ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** : -
माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र अ) सोबत जोडली आहे.

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.दत्तात्रय मोहन पेठकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे पाहता अपीलकर्त्याची मूळ माहिती-मागणी अर्जातील मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसेच याच विषयाबाबत अपीलकर्त्याने केलेल्या अपिलांवर राज्य माहिती आयोगाने यापूर्वी आदेश पारित केलेले आहेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५-११-२००९.

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. राजेश नारायण खडके
संस्थापक अध्यक्ष बहुजन मोर्चा
मध्यवर्ती शासकीय इमारत, कर्मचारी वसाहत,
पुणे-४११ ००१

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (वि)
हॉकर्स पुनर्वसन कमिटी, पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अतिक्रमण निरीक्षक,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८७ / पुणे / २००९ |
| २ | सुनावणीची तारीख | १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. राजेश नारायण खडके
संस्थापक अध्यक्ष, बहुजन मोर्चा
मध्यवर्ती शासकीय इमारत, कर्मचारी वसाहत, पुणे-४११ ००१

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (वि)
हॉकर्स पुनर्वसन कमिटी, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. प्रवीण अष्टीकर

**जन माहिती अधिकारी** तथा अतिक्रमण निरीक्षक,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. गजानन पांडुरंग जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.११.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.१.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनर्निमाण अभियान व बी.एस.यु.पी. (बेसिक सर्व्हिसेस फॉर अर्बन पुअर ) यांच्या योजनेअंतर्गत पुणे शहरातील हॉकर्सच्या पुनर्वसनासाठी पुणे रेल्वेस्टेशन येथे २५.०० कोटी रुपये खर्च केल्याचे आपल्याला जन माहिती अधिकारी तथा अतिक्रमण अधिकारी यांनी कळविले. या २५.०० कोटी रुपयांच्या खर्चाबाबतचा अहवाल मागितला असता तो त्यांच्याकडे व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे दाद मागूनही मिळाला नाही. त्यानंतर असा अहवाल उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा अतिक्रमण अधिकारी व अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, (वि) हॉकर्स पुनर्वसन कमिटी, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. प्रवीण अष्टीकर यांनी सांगितले. खोटी माहिती देऊन आपली दिशाभूल करण्यात आली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. राजेश नारायण खडके यांनी केले.

जे.एन.एन.यु.आर.एम. (जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन) / बी.एस.यु.पी. (बेसिक सर्व्हिसेस फॉर अर्बन पुअर ) या योजनांअंतर्गत पुणे शहरातील हॉकर्सच्या पुनर्वसनासाठी एकूण २७.०३ कोटी रुपयांचा प्रस्ताव मान्य झालेला आहे. त्या अंतर्गत ओटे बांधण्याचे काम चालू आहे. मंजूर झालेली रक्कम २५ कोटी रुपये नसून २७.०३ कोटी रुपये आहे, अशी माहिती श्री. खडके यांना वेळोवेळी लेखी स्वरुपात दिलेली आहे. याच संदर्भात त्यांनी वकिलांमार्फत नोटीस दिली होती. या नोटिशीला दिलेल्या उत्तरातही या सर्व बाबी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. या संदर्भात सातत्याने पत्रव्यवहार करण्यात आला आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त (वि), पुणे महानगरपालिका, पुणे श्री. प्रवीण अष्टीकर यांनी संबंधित कागदपत्रांच्या प्रतींसह लेखी व तोंडी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने पाहता श्री. खडके यांना माहिती देण्यात आली आहे. शासकीय दस्तामध्ये खोट्या नोंदी करुन जन माहिती अधिकारी तथा अतिक्रमण निरीक्षक व अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त (वि), पुणे महानगरपालिका, पुणे यांनी आपली दिशाभूल केली, असे श्री. खडके यांनी लेखी व तोंडी म्हटले असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २५.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विद्यासागर राजकिशोर यादव
मु.पो. हुतात्मा कॉलनी, वाळवा, ता.वाळवा,
जि. सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक
कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
राजाराम बापू इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी,
मॅनेजमेंट स्टडीज, राजारामनगर, साखराळे जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८७२ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.६.२००९ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
राजाराम बापू इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी,
मॅनेजमेंट स्टडीज, राजारामनगर, साखराळे जि.कोल्हापूर
श्री. शिवाजी आण्णा लोकरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.१२.२००८ |

| |
|---|
| ८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. १६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २३.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

जात बदलाच्या प्रस्तावाबाबत आपण पाठविलेल्या पत्रावरील कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, राजाराम बापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मॅनेजमेंट स्टडीज, राजारामनगर, यांनी दिली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी अपिलाची दखल घेतली नही. त्यामुळे आपल्याला आवश्यक असलेली जात बदलाची नोंद होत नसून मोठे नुकसान होत आहे. त्याबद्दल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. विद्यासागर राजकिशोर यादव यांनी लेखी निवेदनात केली आहे.

श्री. यादव यांचे पत्र संस्थेला मिळाले नाही. त्याबाबत माहिती मागणाऱ्या अर्जाविषयी शिक्षण उप संचालकांकडून आलेल्या पत्रानुसार माहिती दिली. श्री. यादव यांची मुख्य मागणी जात बदलाची असून त्याबाबतचा प्रस्ताव ही स्वतंत्र प्रशासकीय कार्यवाहीची बाब आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, राजाराम बापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मॅनेजमेंट स्टडीज, राजारामनगर श्री. शिवाजी आण्णा लोकरे यांनी केले. तथापि श्री. यादव यांचे मूळ पत्र व त्या अनुषंगाने केलेली कार्यवाही याबाबतची माहिती श्री. यादव यांना मिळणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. श्री.यादव यांच्या जात बदलाबाबतच्या प्रस्तावाविषयीचे पत्र मिळाले की नाही व त्यावर काय कार्यवाही केली, याची माहिती जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, राजाराम बापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मॅनेजमेंट स्टडीज, राजारामनगर श्री. शिवाजी आण्णा लोकरे यांनी अपीलकर्ता श्री. विद्यासागर राजकिशोर यादव यांना दि. १५.१२.२००९ पर्यंत द्यावी.

पुणे
दि. २७.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नारायण शंकर वांभिरे
स.नं.८८/७, गुजरात कॉलनी, कोथरुड, पुणे-३८ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** वरीष्ठ प्राधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
पुणे विभाग,२८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११ ००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग,
२८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८५/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** वरीष्ठ प्राधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग,२८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११ ००१

**जन माहिती अधिकारी तथा** संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग, २८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.०२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०७.०३.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.०३.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२६.०४.२००७ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१५.७.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

महादेव कोळी अनुसूचित जमातीच्या वैधता प्रमाणपत्रांच्या अनुषंगाने अपीलकर्ता श्री.नारायण शंकर वांभिरे सातत्याने विविध प्रकारचे अर्ज करीत असतात. त्या त्या वेळी त्यांना माहिती देण्यात येते. माहितीच्या मागणीचा कालावधी २०-३० वर्षांचा असतो. अपिलाच्या सुनावणीला ते कधीही उपस्थित राहत नाहीत. त्यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत त्यांना देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग श्री.टी.आर.धोंडगे व अपिलीय प्राधिकारी तथा वरिष्ठ प्राधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग श्री.ए.डी.शेजाळे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. अंकुश नथु बोरगे
मु. पो. करंदी खेबा, ता. भोर, **अपीलकर्ता**
जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्य कार्यकारी अधिकारी, **उत्तरवादी**
जिल्हा परिषद, पुणे

**जन माहिती अधिकारी तथा** गट विकास अधिकारी,
पंचायत समिती भोर, ता. भोर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८५ / २००९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.१२.२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.२.२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती-मागणी अर्जाची ( जोडपत्र-अ ) ची छायाप्रत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. अकुंश नथू बोरगे यांनी आवश्यक असणारी माहिती प्राप्त न झाल्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. दरम्यानच्या काळात गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भोर यांनी त्यांच्या दि. २५.९.२००९ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहिती दिली असून सदर पत्रावर अपीलकर्त्याने 'संदर्भाधीन अर्जानुसार मागितलेली कागदपत्रे मला मिळाली ', अशी पोच दिली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२५-११-२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुभाष नामदेव तुपे
गोपाळपट्टी, मांजरी बु., ता. हवेली, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, पुणे-१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक
हवेली क्र.२, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९१३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. सुभाष नामदेव तुपे
गोपाळपट्टी, मांजरी बु., ता. हवेली, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, पुणे-१ श्री. चिंतामण भुरकुंडे

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक
हवेली क्र.२, पुणे-३७ श्री. ए.व्ही. चटलावार

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.३.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.५.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.६.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २४.६.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १७.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री. सुभाष नामदेव तुपे यांनी सह दुय्यम निबंधक, हवेली क्र. २ येथील बक्षीसपत्र दस्त क्र. १९६४०/ ९० या दस्तऐवजाच्या प्रमाणित प्रतीची मागणी केलेली होती. तथापि सदर दस्तऐवज झोन दाखला कागदपत्राअभावी स्थगित असल्याने त्यांना त्या दस्ताची प्रत देता आलेली नव्हती. त्या अनुषंगाने झोन दाखला सादर करणेबाबत त्यांना कळविण्यात आलेले होते. त्यांनी त्यांचे दि. २९.६.२००७ रोजीच्या पत्राने पोस्टाद्वारे झोन दाखला सादर केल्यानंतर सदर दस्तऐवजाची नोंदणी सत्वर पूर्ण करण्यात आली. तसेच सदर दस्तऐवजाची प्रत त्यांना पोस्टाद्वारे पाठविण्यात आलेली आहे, असे लेखी निवेदन सह जिल्हा निबंधक (वर्ग-१) व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर श्री. चिंतामण भुरकुंडे यांनी आयोगाला सादर केले. मूळ दस्तऐवज संबंधितांना देणे आवश्यक असून त्रयस्थ व्यक्तीला देता येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १७.११.२००९




( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. रामचंद्र प्रल्हाद पवार
बालाजी निवास, आदेर्शनगर,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, बार्शी,
जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत पुरी, ता. बार्शी,
जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२८ / सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.१.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.१.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२५.२.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२.६.२००८ |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :- माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. ८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभयघटकांमध्ये उर्वरित माहिती उपलब्ध करून देण्याबाबत एकमत झाले होते.

मौजे पुरी येथील कॉंक्रिट गटारीचे काम पूर्ण झाले असून आवश्यक माहिती मिळाली आहे, अशी पोच अपीलकर्ता श्री. रामचंद्र प्रल्हाद पवार यांनी दि. ४.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, पुरी यांना दिली. त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३०.११.२००९**

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मधुकर निवासराव पाटील
मु.पो.कापूसखेड, ता.वाळवा, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
वाळवा पंचायत समिती, इस्लामपूर, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
वाळवा पंचायत समिती, इस्लामपूर, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९३० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मधुकर निवासराव पाटील
मु.पो.कापूसखेड, ता.वाळवा, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
वाळवा पंचायत समिती, इस्लामपूर, जि.सांगली श्री.सु.स.लोहार

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
वाळवा पंचायत समिती, इस्लामपूर, जि.सांगली श्री.कु.पां. भिंगारदेवे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.२.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२३.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्याला अपुरी, चुकीची व विलंबाने माहिती दिल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.मधुकर निवासराव पाटील यांनी केली. श्री.पाटील यांनी मागितलेली माहिती विस्तृत होती. ती संकलित करून ४९६ छायांकित प्रती त्यांना नि:शुल्क देण्यात आल्या. दिलेल्या माहितीत चुकीचे व अपुरे काय आहे, हे प्रथम अपिलाच्या सुनावणीतही ते स्पष्ट करू शकले नाहीत. एका मुद्दयाबाबतची माहिती त्यांनी सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांच्याकडे केलेल्या अर्जाशी संबंधित होती. दि.२२.६.२००९ रोजी ती त्यांना देण्यात आली असून सर्व माहिती मिळाल्याचे त्यांनी लेखी नमूद केले, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, वाळवा पंचायत समिती, इस्लामपूर, जि.सांगली श्री.कु.पां.भिंगारदेवे व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, वाळवा पंचायत समिती, इस्लामपूर, जि.सांगली श्रीमती सु.स.लोहार यांनी पूरक कागदपत्रांसह लेखी व तोंडी केले. माहितीची व्याप्ती जास्त असल्याने माहिती देण्यास विलंब होणार असल्याची कल्पना श्री.पाटील यांना त्या त्या वेळी देण्यात आली होती व त्यांनी त्याला मान्यता दिली होती, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी श्री.भिंगारदेवे यांनी सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३०.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.आप्पासाहेब रामू कदम
मु.लिल्याळ, पो.असंगल-जत, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी वर्ग-१,
पंचायत समिती जत, ता.जत, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत लिल्याळ, ता.जत, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९३१ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आप्पासाहेब रामू कदम
मु.लिल्याळ, पो.असंगल-जत, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी वर्ग-१,
पंचायत समिती जत, ता.जत, जि.सांगली श्रीमती अरूणा दत्तात्रय ईटाई

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत लिल्याळ, ता.जत, जि.सांगली श्री.डी.एस.जोशी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.१२.२००८ व ३१.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.१.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.२.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.२३.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्याला अपुरी व चुकीची माहिती दिली. गायरान व गावठाणामध्ये असलेली दारिद्र्यरेषेखालील व्यक्तिंना दिलेल्या घरांची माहिती दिली नाही, दारिद्र्यरेषेखालील घरकुल मंजुरीबाबतचे निकष चुकीचे लावले आहेत. तसेच सरपंच श्री.सुरेश काशिनाथ कटरे यांनी केलेल्या अतिक्रमणाची माहिती दडवून त्यांच्या मळ्यात बांधलेल्या घराची माहिती दिली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.आप्पासाहेब रामू कदम यांनी केले.

श्री.कदम यांना विहित मुदतीत शुल्क भरण्यास कळविले व शुल्क भरल्यानंतर मूळ अर्जानुसार माहिती देऊन त्यांनी पोहोच दिली आहे. तरीही माहिती पोहोचलेली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत तिल्याळ, ता.जत, जि.सांगली श्री.डी.एस.जोशी यांनी केले. आपल्याला चुकीची व बनावट माहिती देऊन फसवणूक करण्यात आली असल्याचे श्री.कदम यांनी लेखी व तोंडी नमूद केले असले तरी त्याबाबतचे पुरावे त्यांनी दिलेले नाहीत. माहिती योग्य असल्याची खात्री अपिलाच्या सुनावणीच्या वेळी केली आहे. त्यांच्या आक्षेपांबाबतचा तपशील प्राप्त करून घेऊन उत्तर देण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती जत, ता.जित जि.सांगली श्रीमती अरूणा दत्तात्रय ईटाई यांनी केले. श्री.कदम यांनी उपस्थित केलेल्या

आक्षेपांच्या अनुषंगाने माहितीची शहानिशा करून परिपूर्ण माहिती त्यांना नि:शुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती जत, ता.जित जि.सांगली श्रीमती अरूणा दत्तात्रय ईटाई यांनी अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७.११.२००९